सकाळ

# सरळंबेमध्ये चित्रकलेचे धडे

ठाणे, ता. २२ (बातमीदार) : शहापूरमधील जिल्हा परिषद केंद्रशाळा सरळंबे येथे वनशक्ती संस्थेतर्फे पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य दोन दिवसीय शिबिर आयोजित केले होते.

शिबिरात पक्षांची ओळख, पर्यावरणीय माहितीपट, खेळ, प्रश्नमंजुषा स्पर्धा, कागदी पिशवी बनवणे, पर्यावरण संवर्धनासाठी आदिवासींची भूमिका, रोपटे लागवड, मातीकाम कार्यशाळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत हत्ती, बैल, कासव, ससा, मासे, फुलपाखरू, तारामासा, साप अशा विविध प्राण्यांच्या प्रतिकृती, वारली चित्रे, कागदी पिशव्या बनवल्या.



ठाणे : विद्यार्थ्यांनी मातीपासून विविध खेळणी तयार केली.

शिबिरात ५२ विद्यार्थ्यांनी सहभागी झाले. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये पक्षांबद्दल जागृती निर्माण व्हावी, यासाठी ओळख पक्षांची या विषयावर सत्र तसेच पश्चिम घाटातील जैवविविधता या विषयांवर माहितीपट दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये हस्तकला आणि चित्रकला यांचे मूल्यशिक्षण रुजावे तसेच पर्यावरण संवर्धन व्हावे या हेतूने कागदी पिशवी बनवणे कार्यशाळा आणि वारली चित्रकलेची कार्यशाळा घेण्यात आली.

Mumbai, Thane-Today
23/11/2023 Page No. 2